दिवाणी किरकोळ अर्ज नं. ११/२०२६
निशाण क्र. १०/सी सोबत

उलटतपास **श्री. बन्ने** वि.प. चे वकील यांचे मार्फत सुरु

निकाल झाल्याबद्दल मला १२/१२/२०२५ रोजी समजले. निकाल हा २५/११/२५ रोजी झाला होता. डिसेंबर पासुन माझी तब्बेत बरी नसलेने मला निकालाबाबत समजले नाही.

वैद्यकिय दाखला जात दाखल केला आहे तो आयुर्वेदिक उपचाराबाबत आहे. वैद्यकिय प्रमाणपत्र हे १२/१/२६ चे आहे. मी दि. १/१/२०२६ रोजी माझ्या वकीलांना भेटलो होतो. जो दाखला दिला ते डॉक्टर माझ्या माहितीचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी डॉक्टरांना वैद्यकिय दाखला मागितला व त्याप्रमाणे त्यांनी तो दिला होता. दाखला मी वाचुन पाहीला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा वैद्यकिय दाखला दाखल केला आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Order
Digitally signed by SAMEERA YASIN SHAIKH
Date: 2026.03.05 17:45:51 +0530

दिनांक – ०५/०३/२०२६

(श्रीमती एस. वाय. देशमुख )
तदर्थ जिल्हा न्यायाधीश -१
कोल्हापूर

स्पेशल केस (मोक्का) नं. २७/२०२०
सरकार वि.  अमोल माळी वगैरे
निशाण क्र.            /सी

<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र  १ यांची जबानी</u>

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव    –

वय सुमारे    –    वर्षे    उद्योग  –

निवासस्थान –    ता –    जिल्हा–

**– <u>सरतपासणी</u> –**
**<u>श्री. व्ही.जी. सरदेसाई   सरकारी वकील –</u>**

१.

साक्षीदार तिच्या/त्याच्या  पोलीसांच्या समोरील जबाबानुसार साक्ष देत नसलेमुळे तिस/त्यास  फितुर घोषीत करुन उलटतपासणी घेणेची सरकारी वकीलांची तोंडी विनंती मान्य.

<u>उलटतपास सरकारी वकील –</u>

<u>उलटतपास **श्री. एस.एस. कुलकर्णी** आरोपीचे वकील यांचे मार्फत सुरु</u>

उलटतपास संपला
फेरतपास नाही.

दिनांक / /२०२३. (एम.आर.नेरलेकर)

अप्पर सत्र न्यायाधीश

इचलकरंजी

# प्रमाणपत्र

(साक्षीदाराचा जबाब माझे देखत व ऐकणेत त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविण्यात आलेला असुन तो त्यांना वाचुन दाखविण्यात आला व तो बरोबर असल्याचे त्याने कबुल केले.)

दिनांक / /२०२३. (एम.आर. नेरलेकर)

अप्पर सत्र न्यायाधीश इचलकरंजी

सेशन केस नं. २७२/२०२२

जादा आरोपीचे निवेदन –

प्रश्न.१ – चार्ज नव्याने करुन भा.दं.वि.सं. कलम ३३२ लावण्यात आल्यानंतर सरकारी पक्षाने त्यांना ज्याचा पुरावा द्यायचा नाही असे सांगितले आहे. तुम्हाला त्यासंदर्भात कोणाला तपासायचे आहे काय ?

उत्तर – नाही

प्रश्न.२ – तुम्हाला केस बद्दल काही सांगायचे आहे काय ?

उत्तर – मी त्यांना गॅसची टाकी देत नव्हतो. ड्रायव्हर शितल हे गॅसचा नंबर न लावता डायरेक्ट गॅसची टाकी मागत होते व मी त्यांना दिली नाही म्हणुन त्यांनी माझ्यावर खोटा गुन्हा केला आहे.

दिनांक २८/०८/२०२४.

(अपर्णा एस. वाईकर)
अप्पर सत्र न्यायाधीश कोल्हापूर

आरोपीची सही

एम.ए.सी.पी. ३७/२०२१
निशाणी ३२ खाली

<u>शपथेवर उलटतपास वकिल श्रीमती निलम पोतदार यांचेमार्फत सुरु</u>

मी या प्रकरणात माझे लेखी म्हणणे अॅड. दळवी यांचेमार्फत दाखल केले होते. वकीलसाहेबांनी ते तयार केले व माझी सही घेतली. मी केसची कल्पना वकीलांना दिली होती, मात्र ते लेखी म्हणणे काय आहे हे मला माहिती नाही. मी कामात दाखल केलेले प्रतिज्ञापत्रक माझ्या सांगण्याप्रमाणे तयार केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, अपघात मी ओव्हरटेक करुन पुढे जात असताना माझ्या निष्काळजीपणामुळे घडला. कामामध्ये असलेले पोलीस पेपर्स मी वाचलेले आहेत, मात्र पोलीसांनी तशी चुकीची नोंद केली होती. हे म्हणणे बरोबर आहे की, मी शपथपत्रात नमुद केलेले संभाषण हे अर्जदाने केले नव्हते. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की ते अर्जदारच्या जावयाने केले होते. हे म्हणणे चुकीचे आहे की, सदरचा अपघात माझ्या चुकीमुळे झाला व जबाबदारी टाळण्यासाठी मी खोटे पुरावे दाखल केले आहेत. मी निशाणी ५ च्या आदेशाप्रमाणे रक्कम अद्याप न्यायालयात भरलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा शपथपत्रातील मजकूर खोटा व चुकीचा आहे.

दि. २२/०१/२०२५

(अपर्णा एस. वाईकर)
मोटर अपघात न्यायाधीश
कोल्हापूर